**ठळक बातम्या**

- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल देशभरातून शोक व्यक्त, उद्या बारामतीमध्ये अंत्यसंस्कार

- राष्ट्रहिताच्या मुद्द्यावर सरकारला पाठिंबा देण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषणातून आवाहन

- एनसीसीच्या वार्षिक रॅलीमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं संबोधन, राज्यातल्या तनु भान हिचा सर्वोकृष्ट कॅडेट म्हणून गौरव

**आणि**

- औद्योगिक उत्पादन वाढीचा दर दोन वर्षातल्या उच्चांकी पातळीवर

**<><><><><>**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री, आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचं आज सकाळी पावणे नऊच्या सुमाराला विमान अपघातात निधन झालं. उद्या सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात बारामतीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जातील. त्यांच्या निधनानिमित्त राज्य सरकारनं ३ दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून आज शासकीय सुटीही जाहीर केली होती.

राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज बारामतीमध्ये अजित पवार यांचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं. लोकसभेत आज अजित पवार यांच्या निधनाबद्दल

शोकप्रस्ताव मांडण्यात आला. तसंच सभागृहाच्या इतर दिवंगत सदस्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

या विमान अपघातात अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक आणि विमान कर्मचारी पिंकी माळी या सर्वांचं निधन झालं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. पवार यांच्या निधनाने कधीही भरून न निघणारं नुकसान झालं आहे, असं राष्ट्रपती समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या. अजित पवार यांची प्रशासनावर जबरदस्त पकड होती, ग्रामीण भागातलं जीवनमान उंचावण्यात ते अग्रेसर होते, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**होल्ड- बाईट - प्रधानमंत्री - २६ सेकंद**

पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि समर्थकांना हे दुःख सहन करण्याचं धैर्य मिळो अशी प्रार्थना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी व्यक्त केली आहे. अजित पवार यांच्या जाण्यानं एक दिलदार मित्र गमावला आहे. राज्याच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, राज्याच्या प्रश्नांची जाण असणारे ते संघर्षशील नेते होते, असं ते मुख्यमंत्री म्हणाले.

- **- - होल्ड बाईट मुख्यमंत्री** - - -

अजित पवार यांच्या निधनामुळे मोठा भाऊ गेल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ **शिंदे** यांनी व्यक्त केली आहे.

- **- होल्ड बाईट शिंदे** - - -

अजित पवार यांचं निधन आपल्यासाठी वैयक्तिक आणि रालोआसाठीही मोठं नुकसान आहे, अशी भावना केंद्रीय गृहमंत्री **अमित शाह** यांनी व्यक्त केली.

मोठी राजकीय कारकिर्द पुढे असताना अजित पवार यांचं असं जाणं हे अकाली नुकसान आहे, अशा शब्दात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष **मल्लिकार्जुन खरगे** यांनी शोकभावना व्यक्त केली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते **राहुल गांधी** यांनी अजित पवार यांचं निधन अत्यंत वेदनादायक आहे, अशी भावना व्यक्त केली.

लोकसभेचे सभापती **ओम बिर्ला,** संरक्षण मंत्री **राजनाथ सिंह,** परिवहन मंत्री **नितीन गडकरी,** माहिती आणि प्रसारण मंत्री **अश्विनी वैष्णव, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले** यांच्यासह देशभरातल्या विविध मान्यवरांनी पवार यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी अशी मागणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह अनेक विरोधी पक्षनेत्यांनी या मागणीला पाठिंबा दिला आहे.

पण, याप्रकरणावरुन राजकारण न करण्याचं आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं आहे. यात राजकारण नाही हा निव्वळ अपघात आहे, असं त्यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं. एका कर्तृत्त्ववान आणि निर्णयक्षम व्यक्तीला महाराष्ट्र मुकला आहे. झालेलं नुकसान भरुन निघणारं नाही, पण सगळ्या गोष्टी आपल्या हातात नसतात, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने प्रारंभ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर केलेल्या अभिभाषणात राष्ट्रपतींनी विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सामूहिक निर्धाराची गरज असल्याचं सांगितलं. संसदेतल्या सर्व सदस्यांनी राष्ट्रहिताच्या प्रश्नांवर सरकारला

साथ द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात सरकारला यश मिळाल्याचं त्या म्हणाल्या.

**- - होल्ड - राष्ट्रपती बाइट - - -**

यावेळी राष्ट्रपतींनी गेल्या वर्षभरातल्या सरकारच्या कार्याचा आढावा घेताना कृषी उत्पादनात झालेली मोठी वाढ, नवीन कामगार कायदे, नौकानयन क्षेत्रातल्या जुन्या कायद्यांमधले बदल, नक्षलवाद उच्चाटनातली प्रगती, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ३५ लाखाहून अधिक रोजगार निर्मिती, इत्यादी ठळक मुद्द्यांचा उल्लेख केला.

**<><><><><>**

लोकसभेत आज शालिनीताई पाटील, सुरेश कलमाडी यांच्यासह गेल्या वर्षभरात निधन पावलेल्या इतर काही माजी लोकसभा सदस्यांची नावे, तसेच बांग्लादेशच्या माजी प्रधानमंत्री बेगम खालिदा झिया यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राज्यसभेतही झिया, सुरेश कलमाडी यांच्यासह इतर माजी सदस्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवस भरासाठी स्थगित करण्यात आलं.

**<><><><><>**

तरुणांमध्ये आत्मविश्वास आणि शिस्त निर्माण करून त्यांना देशासाठी समर्पित असलेले नागरिक बनवण्याचं काम एनसीसी करते, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते नवी दिल्ली इथं वार्षिक एनसीसी रॅलीत बोलत होते. भारतीय तरुणांकडे कौशल्य आणि संस्कृती आहे, त्यामुळे जग त्यांच्याकडे मोठ्या विश्वासाने पाहते असं प्रधानमंत्री म्हणाले. गेल्या काही वर्षांत एनसीसीचं सामर्थ्य १४ लाखांवरून वाढून २० लाख झालं आहे, यात मुलींचं प्रमाणही वाढलं आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

यावेळी त्यांनी विविध पुरस्कार प्रदान केले. त्यात राज्यातल्या तनु भान हिला एनसीसीच्या वरिष्ठ लष्कर विभागातून देशातली सर्वोत्कृष्ट कॅडेट म्हणून गौरवण्यात आलं.

**<><><><>**

नागरी विमान वाहतूक क्षेत्रातल्या आशियातल्या सर्वात मोठ्या कार्यक्रमाला, “विंग्स इंडिया २०२६” ला आज हैदराबादमध्ये सुरुवात झाली. अवघ्या एका दशकात भारतीय विमान वाहतूक क्षेत्रानं कमालीचा कायापालट अनुभवला असून विमान निर्मितीपासून विमानांची ये-जा,विमाने भाड्याने देणं या सगळ्याच क्षेत्रात देशात नवनवीन संधी उपलब्ध झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन कार्यक्रमात व्हिडीओ संदेशाद्वारे सांगितलं.

**<><><><>**

देशाचा औद्योगिक उत्पादन वाढीचा दर गेल्या महिन्यात ७ पूर्णांक ८ दशांश टक्के झाला. गेल्या दोन वर्षातला हा उच्चांकी दर आहे. नोव्हेंबर २०२५ मधे हा दर ७ पूर्णांक २ दशांश टक्के होता.

कारखान्यातल्या उत्पादनांच्या वाढीचा दर सर्वात जास्त, ८ पूर्णांक १ दशांश टक्के राहिला, तर खनिकर्म उद्योगात ६ पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ झाली. अशी माहिती केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज विशाखापट्टणम इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या १५ षटकात ४ बाद १५२ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**